# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः09.05.2026** **वारः शनिवार**

---

1. शुभेंदू अधिकारी आज पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री म्हणून घेणार शपथ
2. तमिळनाडूमध्ये सत्ता स्थापनेचा पेच कायम
3. 14 पदरी 'विरार-अलिबाग बहु-आयामी परिवहन मार्गिकेच्या' पहिल्या टप्प्याला प्रशासकीय मंजुरी
4. लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांची देशाचे 'चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ' म्हणून नियुक्ती आणि
5. 17 वर्षांखालील महिला आशियाई चषक फुटबॉल' स्पर्धेत भारत उपांत्यपूर्व फेरीत

**<u>बंगाल</u>**

शुभेंदू अधिकारीआज पश्चिम बंगालचे पहिले भाजप मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतील. हा शपथविधी समारंभ कोलकाता येथील 'ब्रिगेड परेड ग्राउंड'वर पार पडणार आहे. या शपथविधी सोहळ्याला पंतप्रधान नरेंद्र मोदी, गृहमंत्री अमित शाह, भाजप अध्यक्ष नितीन नवीन, केंद्रीय मंत्री आणि एनडीए-शासित सर्व राज्यांचे मुख्यमंत्री उपस्थित राहतील अशी अपेक्षा आहे. तत्पूर्वी, काल अधिकारी यांची गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत पार पडलेल्या बैठकीत विधिमंडळ पक्षाचे नेते म्हणून निवड करण्यात आली. या बैठकीत अधिकारी यांच्या नावावर एकमत झाल्याचं शाह यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. यानंतर अधिकारी यांनी पश्चिम बंगालचे राज्यपाल आर. एन. रवी यांची भेट घेतली आणि सरकार स्थापन करण्याचा दावा केला.

**<u>तामिळनाडू</u>**

तामिळनाडूमध्ये सध्या सुरू असलेल्या सत्ता स्थापनेच्या हालचालींमध्ये अनेक घडामोडी घडत आहेत. राष्ट्रीय लोकशाही आघाडीतील AMMK पक्षाचे नेते टीटीव्ही दिनकरन यांनी काल संध्याकाळी उशीरा राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांची भेट घेतली. आपल्या पक्षाचे एकमेव आमदार एस. कामराज यांचा अण्णाद्रमुकचे सरचिटणीस इ. पलानीस्वामी यांना सरकार स्थापन करण्यासाठी पाठिंबा असल्याचं पत्र दिलं. या पत्रावर AMMK चे सरचिटणीस आणि एकमेव आमदार या दोघांच्याही स्वाक्षऱ्या आहेत. हे स्वाक्षरी केलेलं पत्र चेन्नई इथं पोहोचण्यापूर्वीच तमिळ प्रसारमाध्यमांनी AMMK चा टीव्हीकेला पाठिंबा असल्याचं वृत्त दिलं. ते पत्र केवळ बनावटच नसून त्यावर स्वाक्षरी करणाऱ्या आमदारांशी आपला संपर्क देखील झाला नव्हता असं दिनकरन यांनी नंतर पत्रकारांशी बोलताना सांगितलं. या प्रकरणाची सखोल चौकशी करावी अशी आपण राज्यपालांना विनंती केली असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>कॉरीडॉर</u>**

महाराष्ट्र शासनाने 14 पदरी 'विरार-अलिबाग बहु-आयामी परिवहन मार्गिकेच्या' पहिल्या टप्प्याला प्रशासकीय मंजुरी दिली आहे. या मार्गिकेमुळे प्रवासाचा वेळ 90 मिनिटांनी वाचणार असून मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रातील बंदरे, दळणवळण केंद्रे तसंच आगामी पायाभूत सुविधा प्रकल्पांशी असलेली जोडणी सुधारण्याची अपेक्षा आहे. पहिल्या टप्प्यात वसई तालुक्यातील नवघर ते पेण तालुक्यातील बालावली दरम्यान 96 किलोमीटर लांबीचा पट्टा बांधला जाईल. 'महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची' या प्रकल्पाची अंमलबजावणी करणारी संस्था म्हणून नियुक्ती करण्यात आली असून, सार्वजनिक-खाजगी भागीदारी तत्त्वावर हा प्रकल्प राबवला जाणार आहे. ही मार्गिका वसई, भिवंडी, कल्याण, अंबरनाथ, पनवेल, उरण, पेण आणि अलिबाग या तालुक्यांमधील 104 गावांमधून प्रस्तावित करण्यात आली आहे. तसेच मुंबईसह अहमदाबाद, आग्रा, निर्मल, वडोदरा, गोवा, पुणे हे द्रुतगती महामार्ग जोडले जाणार आहेत.

**<u>नियुक्ती</u>**

केंद्र सरकारने लेफ्टनंट जनरल एन. एस. राजा सुब्रमणी यांची सीडीएस अर्थात 'चीफ ऑफ डिफेन्स स्टाफ' म्हणून नियुक्ती केली आहे. संरक्षण मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, लेफ्टनंट जनरल सुब्रमणी हे पदभार स्वीकारल्याच्या दिवसापासून आणि पुढील आदेश मिळेपर्यंत 'लष्करी व्यवहार विभागाचे सचिव' म्हणूनही काम पाहतील. जनरल अनिल चौहान यांचा कार्यकाळ 30 मे रोजी पूर्ण

झाल्यानंतर ते आपला पदभार स्वीकारतील.लेफ्टनंट जनरल सुब्रमणी हे 'राष्ट्रीय सुरक्षा परिषद सचिवालया'मध्ये 'लष्करी सल्लागार' म्हणून कार्यरत आहेत. यापूर्वी त्यांनी 'लष्कर उपप्रमुख' आणि 'जनरल ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ, मध्य कमांड' म्हणून सेवा बजावली आहे; तसेच पश्चिम आणि उत्तर सीमांवरील महत्त्वाच्या लष्करी तुकड्यांचे नेतृत्वही केले आहे.

**<u>हन्ता</u>**

हन्ता विषाणुशी संबंधित प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय आरोग्य मंत्रालयाने खबरदारीचे उपाय सुरू केले आहेत. अटलांटिक समुद्रात एका जहाजावर हन्ता विषाणू संसर्गाच्या नोंदवलेल्या प्रकरणांच्या सद्यस्थितीवर मंत्रालय बारकाईने लक्ष ठेवून आहे. या जहाजावर असलेल्यादोन भारतीय खलाशांमध्ये कुठलीही लक्षणं दिसून आलेली नाहीत, मात्र त्यांच्या प्रकृतीवर देखरेख ठेवली जात आहे. जागतिक आरोग्य संघटनेने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, जहाजावर हन्ता संसर्गबाधित 8 संशयित रुग्ण सापडले. त्यापैकी पाच रुग्णांना हन्ता विषाणूचा संसर्ग झाल्याचं प्रयोगशाळेच्या अहवालात स्पष्ट झालं असून तीन मृत्यूंचीही नोंद झाली आहे. या विषाणूची मानवाकडून मानवाकडे संसर्ग होण्याची शक्यता मर्यादित असल्याचंही जागतिक आरोग्य संघटनेने स्पष्ट केलं आहे. या विषाणूंचा संसर्ग झालेल्या उंदरांमुळे याचा प्रसार होतो.

**<u>इराण-अमेरिका</u>**

संयुक्त राष्ट्र सुरक्षा परिषदेत अमेरिकेच्या पाठिंब्यानं मांडण्यात आलेल्या ठरावाचा मसुदा सदोष आणि राजकीय हेतूंनी प्रेरित असल्याचं म्हणत इराणनं तो नाकारला आहे. त्यामुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीवरून या दोन देशांदरम्यानचा तणाव आणखी वाढला आहे. या प्रस्तावामुळे संघर्ष संपवण्यास या प्रस्तावाची मदत होण्याऐवजी बेकायदा कृत्यांना वैधता मिळेल असा दावा इराणनं केला आहे. इराणच्या बंदरालगतच्या भागात अमेरिकेनं केलेली नाकेबंदी उठवून होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जहाजांची वाहतूक पूर्ववत करणं हा युद्ध संपवून स्थिरतेच्या दिशेनं जाण्याचा एकमेव मार्ग असल्याचं इराणनं म्हटलं आहे. या प्रस्तावाला अमेरिकेसह बहारिन, सौदी अरेबिया, युएई, कुवेत आणि कतारचा पाठिंबा होता. जगातील सर्वात महत्त्वाच्या सागरी मार्गानं वाहतुकीचं  स्वातंत्र्य असावं अशी मागणी करणारा हा ठराव होता.

**<u>युद्धविराम</u>**

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी रशिया आणि युक्रेन यांच्यात तीन दिवसांच्या युद्धविरामाची घोषणा केली आहे. हा तात्पुरता युद्धविराम रशियाच्या 'विजय दिना'च्या पार्श्वभूमीवर करण्यात येत असल्याचं त्यांनी आपल्या 'ट्रुथ सोशल' या समाज माध्यमावर म्हटलं आहे. हा युद्धविराम 9 ते 11 मे या कालावधीत लागू असेल. या तात्पुरत्या युद्धविरामादरम्यान दोन्ही बाजूंच्या प्रत्येकी 1000 कैद्यांची अदलाबदल करण्यात येणार आहे. हे युद्ध कायमस्वरूपी संपुष्टात आणण्याच्या उद्देशाने सध्या चर्चा सुरू असल्याचंही ट्रम्प यांनी म्हटलं आहे.

**<u>निर्बंध</u>**

इराणला शस्त्रे आणि शाहेद ड्रोन तसंच बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे बनवण्यासाठी आवश्यक कच्चा माल मिळवण्याच्या प्रयत्नांना मदत केल्याच्या आरोपावरून, अमेरिकेने चीन आणि हाँगकाँगमधील अनेकांसह 10 व्यक्ती आणि कंपन्यांवर निर्बंध जाहीर केले आहेत. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे अध्यक्ष शी जिनपिंग यांच्या भेटीसाठी चीनला जाणार आहेत, त्याच्या काही दिवस आधी आणि इराणसोबतचे युद्ध संपवण्याचे प्रयत्न थांबले असताना अमेरिकेने हे पाऊल उचलले आहे.

**<u>इलेचर्चा</u>**

इस्रायल आणि लेबनॉन यांच्यात 14 आणि 15 मे रोजी अमेरिकेच्या मध्यस्थीने चर्चा होणार आहे. दोन्ही देशांदरम्यान एक व्यापक शांतता आणि सुरक्षा करार करण्यासाठी ही चर्चा होणार असल्याचं अमेरिकेच्या परराष्ट्र विभागाने म्हटले आहे. या चर्चेत सीमांकनासह संपूर्ण लेबनॉनच्या भूभागावर सार्वभौमत्वाची पूर्ण पुनर्स्थापना या मुद्यांवर चर्चा होण्याची अपेक्षा आहे. लेबनॉनच्या राज्यसत्तेची पूर्ण पुनर्स्थापना आणि हिजबुल्लाहचे संपूर्ण निःशस्त्रीकरण यावरच व्यापक शांतता अवलंबून असल्याचं अमेरिकेनं म्हटलं आहे.

**<u>भारतीय क्रू मृत्यू</u>**

समुद्रातून प्रवास करत असलेल्या जहाजावरील भारतीय कर्मचाऱ्यांच्या मृत्यूबद्दल दुबईतील भारताच्या वाणिज्यदूतांनी दुःख व्यक्त केलं आहे. वाणिज्य दूतांनी समाज माध्यमावर ही घटना दुर्दैवी असल्याचंम्हटलं असून आपण जहाज मालकाच्या सतत संपर्कात

असून घटनेची तपशीलवार माहिती घेत आहोत, असं म्हटलं आहे. यासंदर्भात आवश्यक ती सर्व मदत प्राधान्यानं पुरवण्यात येईल, असंही त्यांनी म्हटलं आहे.

**टिप्पणी**

मंत्री कुंवर विजय शाह यांच्यावर खटला चालवायला मंजुरी देण्याबाबत 4 आठवड्यात निर्णय घेण्याचे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने मध्य प्रदेश सरकारला दिले. ऑपरेशन सिंदूर'च्या पार्श्वभूमीवर लष्करी अधिकारी कर्नल सोफिया कुरेशी यांच्यावर शाह यांनी आक्षेपार्ह टिप्पणी केली होती. याप्रकरणी सर्वोच्च न्यायालयानं स्थापन केलेल्या विशेष तपास पथकाच्या अहवालानंतरही शाह यांच्या विरोधात खटला चालवायला राज्य सरकारनं मंजुरी दिलेली नाही.

**क्रिकेट**

आयपीएल क्रिकेटमध्ये, काल कोलकाता नाईट रायडर्सने दिल्ली कॅपिटल्सचा 8 गडी राखून पराभव केला. 143 धावांच्या विजयाचे लक्ष्य गाठताना, कोलकाता नाईट रायडर्सने पंधराव्या षटकांत 2 गडी गमावून 147 धावा केल्या. फिन ॲलनच्या शतकी खेळावर कोलकाता हे आव्हान सहज पार केलं.

**फुटबॉल**

भारताने काल चीनमधील सुझोऊ येथे झालेल्या 'AFC 17 वर्षांखालील महिला आशियाई चषकफुटबॉल' स्पर्धेत अखेरच्या सामन्यात लेबनॉनवर 4-0 असा विजय मिळवत, प्रथमच या स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत प्रवेश करून इतिहास रचला आहे. भारताकडून, प्रितिका बर्मनने 7 व्या आणि 85 व्या मिनिटाला, अल्वा देवी सेनजमने 36 व्या मिनिटाला, तर जोयाने 72 व्या मिनिटाला गोल नोंदवले. या स्पर्धेच्या उपांत्य फेरीत पोहोचल्यास, भारताचे 2026 च्या 'FIFA 17 वर्षांखालील महिला विश्वचषका'तील स्थान निश्चित होईल.

**हवामान**

भारतीय हवामान विभागाने पुढील दोन दिवसांत देशाच्या दक्षिण भागांतील बहुतांश क्षेत्रात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. आज बिहार, छत्तीसगड, पश्चिम बंगाल, झारखंड आणि विदर्भ या भागांत मेघगर्जनेसह वादळी वाऱ्याची शक्यता वर्तवली आहे. उत्तर प्रदेश, मध्य महाराष्ट्र, मध्यप्रदेश, मराठवाडा, सिक्कीम, किनारपट्टीवरील आंध्र प्रदेश आणि कर्नाटक या भागांत मेघगर्जनेसह विजा चमकण्याचा अंदाज वर्तवला आहे. आज ओडिशा, रायलसीमा, तेलंगणा, कोकण, गोवा, किनारपट्टीवरील कर्नाटक, अंदमान आणि निकोबार बेटे, तसेच ईशान्येकडील राज्यांमध्येही अशीच परिस्थिती राहण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, गुजरात आणि पश्चिम राजस्थानमध्ये गुरुवारपर्यंत उष्णतेची लाट कायम राहण्याचा अंदाज आहे. देशाच्या पश्चिम आणि वायव्य भागांत उद्यापर्यंत कमाल तापमानात दोन ते पाच अंश सेल्सिअसने वाढ होण्याची शक्यता आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.